नि.फौ.ख.क्र. ३७/२०१५
सरकार वि. रुपाली
निशाणी ९३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१२ यांची जबानी.**

शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव** :– राजेंद्र अर्जुन पुजारी
**वय** :– ४३ वर्षे, **धंदा** :– चालक,
**राहणार** :– राजेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**

**०१.** मी २०१४ पासून आटपाडी येथील ग्रामीण रुग्णालय, आटपाडी यांच्या रुग्णवाहिकेवर चालक म्हणून कार्यरत आहे. घटना दि २९/०९/२०१४ रोजीच्या सकाळी ८.०० च्या दरम्यान घडलेली होती. मी डयुटी वर असताना पोलीस ठाणे आटपाडी मधून रुग्णवाहिकेच्या १०८ या क्रमांकावर कॉल आला होता. त्या फोन कॉल वर पोलिसांनी मला असे सांगितले की,''गळवेवाडी येथे एक नवजात बालक मिळून आले आहे, तुम्ही त्यांना जावून उपचारासाठी घेवून या''.

**०२.** त्यानंतर आम्ही म्हणजेच मी, त्यावेळचे डॉ.सुरेखा सतिश देशमुख असे गळवेवाडी येथे एका बाजरीच्या शेतामध्ये गेलो. त्याठिकाणाहून नवजात बालक घेतले आणि ग्रामीण रुग्णालय, आटपाडी येथे उपचारकामी रुग्णवाहिकेतून आणले व तेथे उपचार केले. त्यानंतर अंदाजे अर्ध्या ते एक तासाने त्या नवजात अर्भकाच्या पुढील उपचाराकरिता त्याला रुग्णवाहिकेमधून सांगली येथील सरकारी दवाखान्यामध्ये मी व डॉक्टरांनी नेले. पोलिसांनी त्याबाबत माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री.पी.डी.जेडगे विद्यमान वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

**०३.** माझे शिक्षण बारावीपर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, चालकाचे काम म्हणजे वाहन चालवणे एवढेच असते, वाहन सोडून आम्हाला कोठेही जाता येत नसते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नाही किंवा माझ्याकडे तपास/चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही गळवेवाडी येथील तथाकथित गेलेल्या ठिकाणाच्या चतुःसिमा आणि वर्णन मला सांगता येणार नाही.

**नि.फौ.ख.क्र. ३७/२०१५**
**सरकार वि. रुपाली**
**निशाणी ९३**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी पोलीस ठाण्यातून रुग्णवाहिकेच्या १०८ या क्रमांकावर कॉल आला होता असे मी पहिल्यांदा न्यायालयात सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की,गळवेवाडी येथे एक नवजात बालक मिळून आले आहे, तुम्ही त्यांना जावून उपचारासाठी घेवून या'’असे मी पहिल्यांदा न्यायालयात सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की,त्यानंतर अंदाजे अर्ध्या ते एक तासाने त्या नवजात अर्भकाच्या पुढील उपचाराकरिता त्याला रुग्णवाहिकेमधून सांगली येथील सरकारी दवाखान्यामध्ये मी व डॉक्टरांनी नेले असे मी पहिल्यांदा न्यायालयात सांगत आहे.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की मी पोलिसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे तसा कोणताही प्रकार/प्रसंग त्यादिवशी घडलेला नाही. असे घडले होते की, पोलिसांनी कॉल केला तो डॉक्टरांनी उचलला होता. साक्षीदार सांगतात की, वरून आलेला कॉल पोलीस किंवा डॉक्टर अशा दोघानांही जोडलेला असतो. हे म्हणणे खरे नाही की, मला आलेला कॉल वरुन आलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना मदत करण्यासाठी मी खोटा जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.01.07 17:29:54 +0530

दि.०७/०१/२०२६
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी